PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Shejari shejari
Year: 1990

Song: Aala ala moka
Lyricist: Pravin Davane

आला आला मोका
मिठीचा दे झोका
झोक्यामधे झुलूया ये
आला आला मोका
मिठीचा दे झोका
झोक्यामधे झुलूया ये
अगं कुणीतरी बघेल
खळबळ उडेल
हळूहळू कानोसा घे
घडायला नको विपरीत काही
खबरदारी तू घे
हे कुणीतरी बघेल
खळबळ उडेल
हळूहळू कानोसा घे
ये ये आला आला मोका

आता रे कुणाची पर्वा नको
एकांती दोघात कोणी नको
सुखाची नांदी ही सोन्याची संधी
भित्रट होऊन दवडू नको
थंडीत ठिणगी पाडू नको
नातं हे भलतं जोडू नको
डोळ्याची फडफड हृदयात धडधड
जाळ्यात विजेच्या ओढू नको
गुलाबी सलगी तू करू नको
जीवाला आगाशी लावू नको
मनाची तडफड शंकेची फडफड
मनाची तडफड शंकेची फडफड
घरात मी आहे विसरू नको
विसरून जा रे तोडू नको तारे

प्रीतीच्या बनात ये
अगं कुणीतरी बघेल
खळबळ उडेल
हळूहळू कानोसा घे
ये ये आला आला मोका हा...
इकडं आड आणि विहीर तिथं
कळेना मला गं जाऊ कुठं
प्रीतीचं पाऊल स्पर्शात चाहूल
मधाचं मोहोळ जिथं तिथं
सोडून मला रं जाशी कुठं
तुझ्याविना मी रे जाऊ कुठं
ओठाची कळी तुझ्यासाठी खुळी
सुखाची डहाळी झुले इथं
नाटक कुठलं कुठलं खरं
डोस्कं माझं उठलंय बरं
बायको देखणी शेजाऱ्याची
म्हणता का तुम्ही कळलं पुरं
या तर खरं
बरं बरं
या तर खरं
बरं
पोटामध्ये गोळा खिडकीला डोळा
दाराला आडोसा घे
आला आला मोका
मिठीचा दे झोका
झोक्यामधे झुलूया ये
अगं कुणीतरी बघेल
खळबळ उडेल
हळूहळू कानोसा घे
ये ये आला आला मोका हा...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*